REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X


VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# 'मराठी वैचारिक निबंधलेखन परंपरेतील डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे योगदान'

**प्रा. गजानन चव्हाण**

सहायक प्राध्यापक,मराठी विभाग , छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

## प्रास्ताविक :



इंग्रजी अमदानीच्या काळापासून महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचे नवे पर्व सुरु झाले.तत्पूर्वी वारकरी संप्रदायाने 'हे विश्वची माझे घर' अशी 'वसुधैव कुटुंबकम्'ची संकल्पना प्रत्यक्षात रुजवण्याला सुरुवात केली होती. समताधिष्ठित मानवतावादाची पेरणी संत साहित्यात होत होती. 'आर्ताचेनी वोरसे' गीतार्थ ग्रंथाचे निमित्त होत होते, अध्यात्मिक स्वरुपाची लोकशाही स्थापन करू पाहणाऱ्या ज्ञानदेव-नामदेवांना चातुर्वर्ण्याच्या जोखडातून मुक्त अशा सामाजिक लोकशाहीचीच प्रतिष्ठापना करावयाची होती.

'जे का रंजले गांजले त्यासी' आपुले म्हणणारे तुकाराम महाराज म्हणजे सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे मध्ययुगीन सूत्रधारच होते. अनिष्ट व खुळचट समजुतींवर प्रहार करून ' *ऐसे कैसे झाले भोंदू | कर्म करोनी म्हणती साधू ||*' असा प्रश्न तुकोबांनी समाजाला विचारला, अशा खोटया संधीसाधूंची संगती नाकारली, प्रबोधनाचा हा वारसा नंतर न्या. रानडे , म.जोतिबा फुले,गोपाल गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, र.धों.कर्वे,कर्मवीर भाऊराव पाटील,संत गाडगेबाबा यांनी पुढे चालवला. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रबोधनाचा हा वारसा अत्यंत तर्कसंगतपणे, प्रखर बुद्धिनिष्ठयुक्तिवादाने चालवला तो डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी. डॉ. दाभोळकरांचा प्रतिवाद करता न आल्याने प्रतिगामी शक्तींनी दाभोळकरांना २० ऑगस्ट २०१३ रोजी पिस्तुलातून गोळ्या झाडून संपवले.

साताऱ्यात १ नोव्हेंबर १९४५ रोजी जन्म झालेल्या शहीद डॉ. नरेंद्र अच्युत दाभोळकर यांनी समाजसेवेची प्रेरणा केरळचे विवेकवादी विचारवंत बी.प्रेमानंद, युक्रांदचे नेते डॉ.कुमार सप्तर्षी तसेच १९६९ मध्ये भारतीय सर्वोदय संघाचे कार्याध्यक्ष असलेले बंधू देवदत्त दाभोळकर यांच्याकडून घेतली.एम.बी.बी.एस.ची पदवी संपादन केल्यावर काही काळ वैद्यकीय व्यवसाय केला. राजपत्रित अधिकारी म्हणून सुस्थापित आयुष्य जगण्याची संधी नाकारून अंधश्रध्दा निर्मूलनाच्या आव्हानात्मक कार्यात स्वतःला झोकून दिले प्रथम नागपुरातील काही समविचारी तरुणांनी एकत्र येवून' मानवीय नास्तिक मंच' उभारला व त्यातून अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य सुरू केले. पण थोड्याच काळात 'नास्तिक' या शब्दावर खल होऊन या मंचाने 'अंधश्रध्दा निर्मूलन समिती' हे नाव धारण केले. पुढे समितीच्या कार्यात्मक स्वरूपाविषयी झालेल्या मतभेदांमुळे 'अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समिती' व 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'(अंनिस)असेसमितीचे दोन भाग झाले.त्यापैकी 'अंनिस' ची धुरा दाभोळकरांनी सुमारे १५ वर्षे समर्थपणे सांभाळली. अंधश्रध्दा निर्मूलन व डॉ.दाभोळकर हे एकमेकांचे समानार्थी शब्द बनून गेले महाराष्ट्रात तसेच बेळगाव आणि गोवा या राज्यात मिळून 'अंनिस'च्या सुमारे २०० शाखा कार्यरत आहेत, या शाखांमधून गेल्या २० वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी विविध शाळांमधून शिबिरे भरवली जातात. अंनिसची मुख्य कार्यकारिणी असणारी मध्यवर्ती शाखा साताऱ्यातआहे. समितीचे कार्य लोकशाही पद्धतीने चालते. समितीमार्फत एक वार्तापत्र मासिक काढले जाते. तसेच अंधश्रद्धांशी निगडीत विषयांवर पुस्तिकाही प्रकशित केल्या जातात. 'विज्ञानबोधवाहिनी' च्या माध्यमातून ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान पोहचवण्याचे काम हाती घेतलेले आहे. या कार्यासाठी दाभोळकरांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत हजारो व्याख्याने दिली आहेत अंधश्रद्धांचे विविध प्रकार,त्यामागची चिकित्सा

करण्याची पद्धत, समितीने वेळोवेळी उभारलेले लढे आणि या साऱ्यामागची वैचारिक भूमिका स्पष्ट करण्यासाठी दाभोळकरांनी 'भ्रम आणि निरास','विचार तर कराल', 'अंधश्रध्दा विनाशाय', 'अंधश्रध्दा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम', 'श्रद्धा- अंधश्रध्दा', 'तिमिरातून तेजाकडे', 'प्रश्न मनाचे', ' मती- भानामती', 'ऐसे कैसे झाले भोंदू, आणि 'विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी' या पुस्तकांमधून विपुल लेखन केले आहे या शिवाय 'साधना' या साप्ताहिकाचे संपादकत्व सुद्धा दाभोळकरांनी केले आहे.दाभोळकरांचे प्राणांतिक मोल देऊन केलेले कार्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच दाभोळकरांनी निर्माण केलेले साहित्यही महत्त्वाचे आहे. मराठीतील वैचारिक निबंधाच्या इतिहासात दाभोळकरांच्या निबंधाची दखल निश्चितच घेतली जाईल.

**मराठीतील वैचारिक निबंध लेखनाची परंपरा-** मराठीत निबंध वाङ् मयाची सुरुवात अव्वल इंग्रजी कालखंडापासून झालेली दिसते. अव्वल इंगजी काळात निबंधाचे कालपरत्वे दोन भाग पडलेले दिसतात.१८३२ ते १८४९ हा पहिला विभाग व १८५० ते १८७४ हा दुसरा विभाग. पहिल्या विभागात श्रीमती फेरार व लोकहितवादी हे दोन प्रमुख निबंधकार होऊन गेले. निबंध या वाङ् मयप्रकारची स्पष्ट जाणीव या कालखंडात उदयाला आली नव्हती.सुचेल त्या विषयावर सुचेल त्या प्रकाराने गद्य लिहिणे एवढीच या कालखंडातील लेखकांची निबंध कल्पना दिसते. १८४९ साली 'मराठी ज्ञानप्रसारक' सुरू झाले व त्याच्याद्वारे अव्वल इंग्रजीतील दुसरा कालखंड सुरू झाला.स.म.दिक्षित, गोविंद नारायण माडगावकर, विश्वबाथ नारायण मंडलिक, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर अशा अनेक लहान मोठ्या निबंधकारांनी या काळात निबंधलेखन केले.'दर्पण' (१८३२) या बाळशास्त्री जांभेकर संपादित आद्य नियतकालिकात बाळशास्त्रींच्या इंग्रजी लेखनाचा अनुवाद जनार्दन वासुदेवजी हे करत असत, त्यामध्ये 'नियतकालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात त्यांविषयी', 'इंग्लंड देशातील राज्यरीतींत बदल करण्यासंबंधी यत्न', 'राममोहन राय' इत्यादी विविध विषयांवर गद्य स्फुटे प्रकाशित झालेली होती. बाळशास्त्री यांनीच संपादित केलेल्या 'दिग्दर्शन' या मासिकातही माहितीपर व सूचनावजा लेख आलेले दिसतात, परंतु स्वतंत्र चिंतनाचा अभाव या गद्यात जाणवतो. ही उणीव 'प्रभाकर' पत्र सुरू करून भाऊ महाजन यांनी भरून काढली. 'प्रभाकर' मध्ये 'ग्रेट ब्रिटन देशाची राजनीती', 'फ्रेन्च्यांचे बंडाचा वृत्तांत', 'विधवाविवाह', 'स्त्रीशिक्षण', 'ताबुताची चाल', 'वेठबिगार' या विषयांवर काही चांगले लेख प्रसिद्ध झाले. दर्पणच्या तुलनेत या लेखात वैचारिक भरीवपणा व शैलीचा जिवंतपणा अधिक होता.'ज्ञानोदय' (१८४२) आणि 'ज्ञानप्रकाश' (१८४९)या नियतकालिकांनी मराठी निबंध घडवण्यात आपला वाटा उचलला. १८५० साली निघालेल्या 'मराठी ज्ञानप्रसारक' या मासिकातून निबंध स्पष्ट रुपात आविष्कृत झाला. 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभेत वाचल्या जाणाऱ्या निबंधांपैकी काही उत्कृष्ट निबंध 'मराठी ज्ञानप्रसारक' या मासिकात प्रकशित होत त्यामध्ये भा.दा.पाळंदे, वासुदेव बापू, ल.नृ.जोशी, सखाराम मनोहर दिक्षित, गोविंद नारायण माडगावकर,दाजी परशुराम इ. या निबंधकारांचे निबंध प्रकाशित झालेले दिसतात.' केरो लक्ष्मण छत्रे व महादेव गोविंद रानडे या पुढे आपापल्या क्षेत्रात विशेष मान मिळवणाऱ्या व्यक्तींचे निबंध 'मराठी ज्ञानप्रसारका'मधूनच प्रकाशित झालेले होते. स.म.दिक्षित यांनी आपल्या 'हिंदू लोकांच्या त्रिकाल-स्थिती विषयी' या निबंधात आर्थिक भूमिकेने स्वदेशीचा पुरस्कार केलेला आहे.चंद्रिका (१८५४) या मासिकात 'शिक्षणपद्धतीविषयी विचार', 'राजसत्ताक व लोकमतानुसारी राज्यातील सौकर्याविषयी विचार', ' निरिच्छतेविषयी निबंध' इ. निबंध प्रकाशित झाले. 'गोऱ्या लोकांचा काळेपणा' व 'देशाची उत्तम स्थिती' हे निबंध विशेष महत्त्वाचे आहेत. लोकहितवादी (गोपाल हरी देशमुख) यांची 'शतपत्रे' आधी 'प्रभाकर' पत्रात प्रसिद्ध झाली, नंतर १८६६ मध्ये 'निबंधसंग्रह' या पुस्तकात त्यांचा समावेश करून स्वतंत्ररित्या छापण्यात आली. लोकहितवादींनी राजकीय, धार्मिक,सांस्कृतिक व सामाजिक अशा विषयांवर हे पत्र लेखन केलेले आहे, अर्थात हे पूर्वनियोजित लेखन नाही. त्या-त्या वेळी सुचेल तो विषय घेऊन त्यांनी लेखन केलेले आहे. लोकहितवादींच्या लेखनाचे पहिले ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील उत्कट भावना, पोशाखीपणासारखा साधा विषय असो नाहीतर पुनर्विवाहासारखा गंभीर विषय असो, लोकहितवादी त्याविषयी अत्यंत तळमळीने लिहितात.दादोबा पांडुरंगांची 'यशोदापांडुरंगी' ला जोडलेली टीकात्मक प्रस्तावना हा एक उत्कृष्ट निबंधच आहे.काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांचा 'नावल व नाटक ह्या विषयी निबंध',कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे 'मराठी व्याकरणावर निबंध' तसेच 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' या शास्त्रीय ग्रंथातील अनेक लेख उत्तम निबंधात जमा होतील. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी एका नव्या जागृतीचे युग सुरू केले.वाघिणीच्या दुधावर पोसलेल्या या मराठीच्या शिवाजीची लेखणी प्रारंभी जरी विद्वत्व आणि कवित्व, संपत्तीचा उपभोग, इतिहास,भाषादूषण,भाषापद्धती,वाचन,भाषांतर,लोकभ्रम या सारख्या 'निरुपद्रवी' विषयांवर आपला अंमल गाजवीतहोती तरी थोड्याच वेळात तिचे सामर्थ्य प्रत्ययास येऊ लागले. प्राचीन भारतीय परंपरांचा गुणगौरव करताना ढोंगी सुधारकांच्या सुधारणांचा साजशृंगार उतरून टाकू लागली, प्रतिपक्षाचे वाभाडे काढू लागली. 'इंग्रजी राज्य हा इष्ट असा दैवयोग'या प्रवृत्तीचा कणाच मोडून टाकण्याचे कार्य विष्णुशास्त्रींच्या निबंधांनी केले. विष्णुशास्त्रींच्या नंतर टिळक व आगरकरांनी मराठी निबंध जोपासला.भाषेचा डौल, प्रतिपक्षावर प्रखर

टीका,मुद्देसूद असे गांभीर्यपूर्ण विवेचन,विषयाची मूलगामी सखोल चर्चा हे टिळकांच्या निबंधाचे विशेष होते. टिळकांच्या निबंधांमधील 'युनिव्हर्सिटया ऊर्फ सरकारी हमालखाने', 'हिंदुत्व व सुधारणा', 'इंग्रजी राज्यात आम्हास फायदा काय झाला?', 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे', 'पुनःश्च हरिः ओम' यांसारखे निबंध पुन्हा पुन्हा वाचण्यासारखे आहेत. टिळकांचा निबंध लेखनाचा हेतू राजकीय सुधारणांचा होता तर आगरकरांनी सामाजिक सुधारणांचा हेतू समोर ठेवून आपली लेखणी चालवली नवमतवादाचे पहिले पुरस्कर्ते म्हणून आगरकरांचे नाव मराठीच्या निबंध विकासाच्या इतिहासात कायम राहील.चिपळूणकरांच्या परंपरेतील मातब्बर निबंधकार म्हणून 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे यांचे नाव घ्यावे लागते.निबंधाला खास असे वाङ्‌मयीन स्वरूप देणारे न.चिं. केळकर,भावनेची प्रखरता व बुद्धिवादाचे चापल्य यांचा सुरेख संगम असणारे वि.दा.सावरकर यांच्या बरोबरीने ल.रा.पांगारकर, डॉ. श्री.व्यं.केतकर, वा.म. जोशी, अच्युतराव कोल्हटकर, श्री.कृ. कोल्हटकर, चिं.वि. वैद्य, वि.का.राजवाडे, ना.गो. चापेकर, अशा निबंधकारांची नावे स्वातंत्र्यपूर्व काळातील उत्कृष्ट निबंधकार म्हणून घेतली जातील.

**स्वातंत्र्योत्तर काळातील निबंधकारांमध्ये** श्री. म. माटे, काका कालेलकर, आचार्य विनोबा भावे, पु.ग.सहस्त्रबुद्धे, साने गुरुजी, ग.त्र्यं. माडखोलकर, प्र.के. अत्रे, न.र.फाटक, द.के.केळकर, मा.दा. अळतेकर, पं. सातवळेकर, ज.स.करंदीकर, ग.वि.केतकर, पु.भा.भावे, पां.वा.गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, ह.रा. महाजनी, केशवराव भोळे, रा. भि. जोशी, बा.सी.मर्ढेकर, वा,ना.देशपांडे या निबंधकारांच्या योगदानाचा विचार होईल. या सर्व निबंधकारांमध्ये श्री. म. माटे यांचे निबंध श्रेष्ठ ठरतात कारण समाजाबद्दल वाटणारी सखोल सहानुभूती व रसिकवृत्ती यांच्याबरोबर प्रौढ, प्रगल्भ पण कमालीची सलगी करणारी भाषा यांचा लाभ माटे यांना झालेला होता.

**डॉ.नरेन्द्र दाभोळकरांचे मराठी निबंधाला योगदान**– नव्या पिढीत श्रेष्ठ प्रकारचा समर्थ निबंधकार दिसत नाही, प्रौढ विचारांची मासिके मोजकी असून त्यातूनही निबंधाचे दर्शन फारसे होत नाही. दैनिक वृत्तपत्रांचे व साप्ताहिकांचे अग्रलेख निबंध या पदवीपर्यंत पोहचत नाहीत. निबंधाचा प्रवाह मराठीत क्षीण होत असल्याचे मान्य करुनही स्वातंत्र्यकाळानंतर नवविचारांचे लोण समाजातील विविध थरांपर्यंत पोहचवण्याचे काम मराठी निबंधाला करायचे आहे असा आशावाद वि.स. खांडेकरांनी प्रकट केलेला होता. या आशावादाचे मूर्तरूप म्हणून डॉ. दाभोळकरांच्या लेखनाकडे पाहिले पाहिजे. डॉ. दाभोळकरांच्या ग्रंथरचनेचा आढावा वर घेतलेला आहेच, या ग्रंथांमधून व्यक्त होणारी डॉ. दाभोळकरांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये विशद करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे.

## डॉ. दाभोळकरांवरील वाङ्‌मयीन संस्कार -

डॉ. दाभोलकरांचे साहित्य वाचत असताना त्यांच्यावरील वाङ्‌मयीन संस्कारत्यांच्या साहित्यात जागोजागी दिसून येतात. तुकारामांच्या नीतिपर अभंगांपासून ते केशवसुत, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर यांच्या समर्पक काव्यपंक्तींपर्यंत असंख्य अवतरणे त्यांच्या लेखनात आहेत. बसवेश्वर, तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले,न्या. रानडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर,राजर्षी शाहू महाराज, गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे या सर्व विचारवंताच्या संस्कारातून डॉ.दाभोळकरांची वैचारिक जडणघडण झालेली आहे. त्यामुळेच डॉ.दाभोळकरांचा वैचारिक प्रतिवाद सडेतोड झालेला आहे.अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समिती जे लढे उभारले किंवा अंधश्रद्धा विरोधी कायद्याचे विधेयक मांडले गेले असताना डॉ.दाभोळकरांनी विरोधकांना याच विचारवंतांचे दाखले दिले आहेत. 'अंधश्रद्धा निर्मूलन-एक कठीण आव्हान' या लेखात ते म्हणतात, 'समितीला प्रश्न विचारण्यात येतो की 'समिती फक्त हिंदूंच्याच अंधश्रद्धांचे निर्मूलन करते का?' यावर उत्तर देताना ते म्हणतात की "या देशात आजही ८२ टक्के हिंदू आहेत. त्यांचा घरात अंधश्रद्धा निर्मूलनाच्या रुपाने ज्ञानाचा दिवा लावला, तर समाजातील फार मोठ्या वर्गात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रकाश पसरेल. मग उरलेल्या अंधारालाही हळूहळू काढता पाय घ्यावाच लागेल, ही सरळ बाब या मंडळींना कशी समजत नाही ? ... अर्थात देशात जर बहुसंख्य हिंदू आहेत तर समितीकडे येणारी बहुसंख्य प्रकरणे ही हिंदुंचीच असणार पण त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे चार्वाक, बुद्धापासूनची एक मजबूत अंधश्रद्धा निर्मूलनाची परंपरा महाराष्ट्रात आहे ती थेट गाडगेबाबा, प्रबोधनकार ठाकरे आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत. हा वारसा समजून घेतला, तर समितीवरील आक्षेपाला स्वतंत्रपणे उत्तर देण्याची गरज पडणारच नाही".

महाराष्ट्रातील प्रबोधनाचा सर्व वारसा डॉ.दाभोळकरांनी अभ्यासला होता, या वैचारिक मुशीतून त्यांचे कणखर व लढाऊ व्यक्तिमत्त्व तयार झाले होते, महाराष्ट्रातील कोणत्याही नेत्यांशी, मंत्र्यांशी किंवा मुख्यमंत्र्यांशी संवाद साधतानाअथवा धार्मिक समजुतींवर जाहीर वादचर्चेचेआव्हान स्वीकारताना या मजबूत वैचारिक घडणीमुळे ते प्रतिपक्षाला निष्प्रभ करत होते. समकालीन विचारवंत व सामाजिक चळवळी यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सहभागी असणारे लेखक व नियतकालिके यांचा ऋणनिर्देश त्यांनी 'ऐसे कैसे झाले भोंदू या पुस्तकाच्या मनोगतात केलेला आहे त्यात ते म्हणतात, "चळवळीतील अनुभवातून या पुस्तकाचे लेखन

जसे घडले, तसेच अनेक मान्यवरांची पुस्तके, लेखन, चर्चा यांचा देखील मांडणीत उपयोग झाला....मे. पुं. रेगे, अनिल अवचट, विठ्ठल प्रभू, अरुणा ढेरे, डॉ.श्रीकांत जोशी, उत्तम कांबळे, अशोक जैन, श्याम मानव, डॉ.प्रदीप पाटील, माधवशास्त्री दिवेकर, प्रदीप कर्णिक, उदय मेहता, अबकडई मासिकाचा 'चमत्कारा'वरील दिवाळी अंक, अंधश्रध्दा निर्मूलन मासिकाचे अंक अशा अनेकांच्या अनेकांगी विचार मंथनाचा मला फायदा झाला".

## डॉ. दाभोळकरांच्या लेखनाची वाङ् मयीन वैशिष्ट्ये -

➢ *डॉ दाभोळकरांच्या लेखनातील प्रमुख आशय:* दाभोळकरांच्या लेखनाचा प्रमुख आशय म्हणजे अंधश्रध्द समाजात वैज्ञानिक जागृती घडवून आणणे, त्यासाठी उभ्या केलेल्या संघटीत लढयाला वैचारिक पाठबळ देणे, अंनिस च्या माध्यमातून ज्या चळवळी केल्या त्यांचा अनुभव शब्दबद्ध करून समाजाला सुजाण बनवणे. 'अंनिस' ही केवळ दाभोळकरांची चळवळ नाही किंवा अंधश्रद्धा निर्मूलन हे केवळ 'अंनिसचे' काम नाही तर प्रत्येक माणसाला आपण 'अंनिसचे' कार्यकर्ते आहोत अशी जाणीव करून देणे, दाभोळकर हे सर्व करतात कारण आपणच हे केले पाहिजे या विचारांवर त्यांची दृढ निष्ठा आहे. आपण विज्ञान युगात वावरतात विज्ञानाची सृष्टी घेतली परंतु विज्ञानाची दृष्टी घेतली नाही, ही दृष्टी देणे हे आपले घटनात्मक कर्तव्य आहे. राज्यसंस्थेने या घटनात्मक मूल्याचा प्रचार-प्रसार केला पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करणारी शिबिरे घेतली पाहिजेत, यासाठीच डॉ.दाभोळकरांचा सर्व लेखन प्रपंच आहे.

➢ दाभोळकरांनी आपल्या लेखनात त्यांनी केलेल्या सर्व चळवळी त्यांच्या सर्व बारकाव्यांसह साद्यंत वर्णन केलेल्या आहेत, हे सर्व एका कर्त्या सुधारकाच्या अनुभवाचे बोल असल्याने त्यातील चिंतन मूलगामी स्वरूपाचे व समाजाची सद्यस्थिती प्रकट करणारे आहे. दाभोळकरांनी त्यांच्या दहा पुस्तकांमधून अनेक चळवळी शब्दांकित केल्या आहेत ज्यामध्ये व्यापक सामाजिक सहभाग असणारी श्रद्धास्थाने आहेत उदा. 'बाळूमामाची नवसाची मेंढरे', 'भ्रामक वास्तुशास्त्र', 'फलज्योतिषविज्ञान एक थोतांड', 'मांढरदेवी: हे मौन बोलके आहे', 'होळीची परंपरा : कालोचित कृती करावी', 'भविष्यावरमात करण्यासाठी इच्छाशक्तीच हवी', 'बुद्धी दे गणनायका'!, 'स्त्रिया आणि अंधश्रध्दा : स्वरूप, कारणे व उपाययोजना', 'मल्लिनाथ महाराजांचे मायाजाल', 'नाणीजचे नरेंद्र महाराज', 'रेवदंडा, जि. रायगडचा बैठक संप्रदाय', 'आसाराम बापूंचे अवैज्ञानिक यौवन मार्गदर्शन', 'निर्मलामातांची कुंडलिनी जागृती', 'आचार्य रजनीशांच्या संभोगातून समाधीकडेचे गौड बंगाल', 'इस्कॉनची स्वयंकेंद्रित व अनुशासित तसेच धूळफेक करणारी काळी पार्श्वभूमी', 'चंद्रास्वामीचा आचारी विनोदानंद झा', 'अनिरुद्ध जोशी ऊर्फ अनिरुद्ध महाराज','शेगावचे गजानन महाराज', 'ज्ञानेश्वरीतील कुंडलिनी जागृती व आजचे विज्ञान', 'बी.बी.सी. वरील पुनर्जन्माचे दाखले व सत्यस्थिती','पंच ज्ञानेंद्रिये, मन व बुद्धीस अनुभवावयास येणारे चमत्कार व त्यामागील वैज्ञानिक कारणे'. इ.

➢ दाभोळकरांनी मांडलेल्या विषयांची व्याप्ती फार मोठी आहे. माणसातील विवेकबुद्धीला आवाहन करताना दाभोळकरांच्या लेखणीला विलक्षण धार चढते. सत्तास्थानी असलेल्या राजकारणी व्यक्तींना दाभोळकरांनी जी आवाहने केली आहेत त्यामध्ये असणारी उपरोधाची धार ह्यावर स्वतंत्र शोधनिबंध लिहिला जाऊ शकतो.

डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या संपूर्ण जीवनाच्या योगदानाची दखल हा पुरोगामी महाराष्ट्र नक्कीच घेईल व त्यांचे साहित्य समाजासाठी दिपस्तंभाचे कार्य करेल असा आशावाद वाटतो.

संदर्भ:

१. श्रद्धा-अंधश्रध्दा – डॉ. नरेंद्र दाभोळकर
२. विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी – डॉ. नरेंद्र दाभोळकर
३. ऐसे कैसे झाले भोंदू – डॉ. नरेंद्र दाभोळकर
४. अंधश्रध्दा विनाशाय – डॉ. नरेंद्र दाभोळकर
५. अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र

६. तिमिरातून तेजाकडे – डॉ. नरेंद्र दाभोळकर, महान्यूज लेख –प्रकाश अकोलकर
७. एक आयुष्य, चळवळीतील – डॉ. नरेंद्र दाभोळकर, ब्लॉग - अविनाश धर्माधिकारी
८. अर्वाचीन मराठी वाङ् मयाचा इतिहास – डॉ. प्र. न. जोशी

LBP PUBLICATION